(१९)

# ाईंदर महानगरपालिका

## महासभा दि. २६/०७/२०१८

**प्रकरण क्र. ४९ :-** मा. महासभा दि. २६/०२/२०१८ रोजीच्या ठराव क्र.८४ अन्वये पारित केलेल्या जाहिरात विभागाच्या ठरावातील मुद्दा क्र.२ व ३ याबाबत पुर्नःविचार करुन निर्णय घेणे व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून नव्याने जाहिरात दर व नियोजन करणेकामी एजेन्सी नियुक्त करणेबाबत.

**ठराव क्र. ४९ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३८६ आणि ३९२ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ अन्वये जाहिराती व आकाशचिन्ह इत्यादींवर नियंत्रण करण्याची तरतुद आहे. त्याअनुषंगे मिरा भाईंदर क्षेत्रातील जाहिरातीच्या (विविध भागात होर्डींग्ज (आकाशचिन्ह), कमानी, व्यापारी आस्थापनेवरील जाहिराती, दुकानांवरील जाहिरात फलक व अन्य प्रकारच्या जाहिराती) वाढ होण्याच्या दृष्टीने मा. स्थायी समिती ठराव क्र.४३, दि.२९/०२/२००८ व मा. महासभा ठराव क्र.३५, दि.१९/०३/२००८ अन्वये जाहिरात फी चे दरपत्रकास मंजुरी देण्यात आली आहे. यानंतर जाहिरातीचे दर वाढविण्यात आलेले नाहीत. याकरीता मा. स्थायी समिती सभा दि.११/०७/२०१४ प्र.क्र.२८, ठराव क्र.२८ जाहिरात प्रकरण मध्ये दरवाढीस मंजुरी दिलेली आहे. त्यास मा. महासभा दि.१९/०७/२०१४, ठराव क्र.२७ ने दरास मंजुरी दिलेली आहे. त्या दरामध्ये दि.०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७, दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८, दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१९ या प्रत्येक आर्थिक वर्षात १० टक्के वाढ करुन त्याप्रमाणे जाहिरातीचे दर निश्चित करुन आकारणी करण्यात यावी.

१) ज्या जाहिरातदाराकडून वर निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी आकारणी केली असेल त्यांच्याकडून मागील थकबाकी वसुल करण्यात यावी.

२) संबंधीत ठेकेदारास ८ दिवसाची मुदत देवून जाहिरात थकबाकी त्यांचेकडून वसुल करावी जर ठेकेदार थकबाकी जमा करत नसेल तर त्यांनी लावलेली होर्डींग्ज जप्त करुन ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात यावा.

३) मा. महासभा दि.१९/०७/२०१४, ठराव क्र.२७ ने मंजुर केलेल्या ठरावावर ज्या अधिकाऱ्याने अंमलबजावणी केली नसेल त्यांचेवर कडक कारवाई करुन गुन्हा दाखल करुन जाहिरातीची थकबाकी त्यांचेकडून वसुल करण्यात यावी.

४) मा. महासभा दि. २६/०२/२०१८ ठराव क्र. ८४ ने मंजुर केलेल्या प्रस्ताव अॅन्टी करप्शन विभागाकडे पाठवून त्याचा पाठपुरावा करावा.

५) यापूर्वी ज्या निविदा जुन्या दराने काढण्यात आलेल्या आहेत, ज्या निविदांना अंतिम मंजुरी मिळालेली नाही व कामाचे आदेश काढण्यात आलेले नाहीत अशा सर्व निविदा नामंजुर करुन नविन दराने फेरनिविदा काढण्यात याव्यात.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका जाहिरात दरावर वर निश्चित केलेल्या दराप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | वैती चंद्रकांत सिताराम | १ | भोईर राजू यशवंत | |
| २ | पाटील धृवकिशोर मन्साराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | जैन गीता भरत | ४ | परेरा कॅटलीन एन्थोनी | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | नलावडे दिनेश दगडु | निरंक |
| ६ | यादव मिरादेवी रामलाल | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | शाह रिटा सुभाष | ७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ९ | सावंत अनिल दिवाकर | |
| १० | भोईर सुनिता शशिकांत | १० | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |

सत्य प्रत

नगर सचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | पाटील वंदना मंगेश | ११ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ |
| १२ | जैन सुनिता रमेश | १२ | घरत तारा विनायक |
| १३ | अरोरा दीपिका पंकज | १३ | पाटील अनिता जयवंत |
| १४ | नाईक विविता विवेक | १४ | गोविंद हेलन जॉर्जी |
| १५ | भावसार वंदना संजय | १५ | भोईर भावना राजू |
| १६ | बेलानी हेमा राजेश | १६ | डिसा मर्लिन मर्विन |
| १७ | भोईर विणा सुर्यकांत | १७ | सपार उमा विश्वनाथ |
| १८ | सोनार सुरेखा प्रकाश | १८ | परदेशी गिता हरीश |
| १९ | मुखर्जी अनिता बबलू | १९ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन |
| २० | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २० | पाटील वंदना विकास |
| २१ | म्हात्रे परशुराम पदमाकर | २१ | पाटील संध्या प्रफुल्ल |
| २२ | म्हात्रे मोहन गोपाळ | २२ | अहमद साराह अकरम |
| २३ | शाह राकेश रतिशचंद्र | २३ | बगाजी शर्मिला विन्सन्ट |
| २४ | शेट्टी अरविंद आनंद | २४ | डांड्या एलायस दुमिंग |
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | |
| २६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | |
| २७ | शाह सीमाबेन कमलेश | | |
| २८ | रकवी वैशाली गजेंद्र | | |
| २९ | कांगणे मीना यशवंत | | |
| ३० | परमार हेतल रतिलाल | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | |
| ३२ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | |
| ३३ | भोईर जयेश भानुदास | | |
| ३४ | शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ३५ | थेराडे संजय अनंत | | |
| ३६ | गजरे दौलत तुकाराम | | |
| ३७ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | |
| ३८ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | |
| ३९ | दुबे मनोज रामनारायण | | |
| ४० | खंडेलवाल सुरेश जगदीश | | |
| ४१ | भोईर गणेश गजानन | | |
| ४२ | पारधी सुजाता यशवंत | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

Dmehta

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सत्य प्रत**

नगर सचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका